# २०. मूल्य शिक्षण व नैदानिक उपागम

परिवर्तनीयता हा विश्वाचा अपरिवर्तनीय नियम आहे. ह्या परिवर्तनाच्या प्रवाहात आज प्रत्येक घटक नूतन बनत आहे. अनेक युगांपासून हा परिवर्तनाचा प्रभाव, परिवर्तनाची ही प्रक्रिया सुरू आहे. अगदी आदीमानवापासून तर आज Knowledge Society पर्यंत मानवी समाजाचा इतिहास पाहिल्यास जैविक, भौतिक, वैज्ञानिक, मानसिक, आर्थिक, अशा कितीतरी क्षेत्रात हे परिवर्तन घडून आले आहे. ह्याच परिवर्तनाचा एक भाग म्हणून आज संपूर्ण जग एक वैश्विक खेडे म्हणून ओळखले जात आहे. परंतु वास्तविकता अशी आहे, की ह्या प्रत्येक परिवर्तनास मानवाने स्वीकृती दिली नाही. प्रत्येक परिवर्तनाशी त्याचे तादात्म्य होऊ शकले नाही. याचे महत्त्वाचे कारण ह्या परिवर्तनाशी तादात्म्यता साधण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होऊ शकली नाही. म्हणूनच की काय आज जागतिकीकरणाची संकल्पना भारताने व्यावहारिक स्तरावर स्वीकारली. पण भारतीय मनाने तिचा स्वीकार केला नाही. वास्तविक पाहता भारतीय संस्कृती, भारतीय सांस्कृतिक परंपरा यात संपूर्ण जगावर अधिराज्य गाजविण्याची क्षमता आहे. कारण अध्यात्म हे अपरिवर्तनीय तत्त्व भारताजवळ आहे. आज संपूर्ण जग भारताकडे आशेने पाहात आहे. भारतीय अध्यात्म हा भारताचा आत्मा आहे. परंतु परिवर्तनाच्या ह्या लाटेत आम्हाला आमच्या ह्या वैभवाचा विसर पडला आहे. ह्याचे महत्त्वाचे कारण जर कोणते असेल तर भौतिक वादाचा मानवी जीवनात झालेला प्रवेश, यंत्रवादाचा मानवी जीवनावर बसलेला पगडा. भौतिक वादाने मानवाचे जीवन असह्य बनविले तर यंत्रवादाने मानवी मनच यंत्रवत् बनविले.

परंतु जेव्हा जेव्हा मानवी संस्कृतीवर, मानवी मनावर अशा प्रकारची आक्रमणे झाली, तेव्हा तेव्हा ह्या आक्रमणांनी प्रतिकार करून त्यावर मात करण्याची क्षमता केवळ शिक्षणानेच व्यक्तीमध्ये निर्माण केली. आज पुन्हा शिक्षणाच्या क्षेत्रात हत्यार उपसण्याची वेळ आली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात आज नव्याने मूल्य शिक्षणाचा विचार १९८६ पासून सुरू झाला व १९९७ पासून तो राबवायला सुरुवात झाली. पण खरेच हे मूल्य शिक्षण यशस्वी झाले का हा एक संशोधनाचा विषय आहे. परंतु एक गोष्ट खरी, की आता केवळ एका तासिकेतून मूल्य रुजविण्याची कल्पना शक्य नाही, कारण मूल्य संस्कारांच्या माध्यमातून जर व्यक्तीमध्ये मूल्यविकास घडवून आणायचा असेल तर आजच्या मूल्य शिक्षणाबाबतच्या प्रक्रियेतच बदल घडवून आणावा लागेल.

**मूल्य शिक्षणात नैदानिक उपागम आणण्याकरीता –**

१. मूल्याधिष्ठित शिक्षणाची उद्दिष्टे ठरविणे.

२. उद्दिष्टाधिष्ठित अभ्यासक्रमाची रचना करणे.

३. अध्यापन पद्धतीचे निर्धारण करणे.
४. मूल्याधिष्ठित शिक्षणाकरिता मूल्यमापनाची योजना सुचविणे.
५. मूल्याधिष्ठित शिक्षक प्रशिक्षण योजना सुचविणे.
६. शिक्षणातील पालकांच्या सहभागावर प्रकाश टाकणे.

वरील उद्देशांना अनुसरून पुढीलप्रमाणे विवेचन देण्यात येत आहे.


**मूल्याधिष्ठित शिक्षणाचे उद्देश :**

शिक्षणातून व्यक्ती सुसंस्कारित व्हावयास हवी. मूल्याधिष्ठित शिक्षणातून अशा संस्कारांचे संक्रमण व संवर्धन होईल ज्याच्या आधारावर व्यक्ती 'मानवापासून ते विश्वमानवा' पर्यंत प्रगती करेल. शिवाय व्यक्तीचा विकास Knowledge Master to Wisdom Master असा असेल. हा क्रमविकास साधण्याकरिता International Commission of Education for 21st Century ने प्रसिद्ध केलेल्या अहवालात २१ व्या शतकाला शिक्षणाबाबत पुढील आव्हाने पेलायची आहेत. ह्याच आव्हानांना Four Pillers of Education असेही संबोधले जाते. ही आव्हाने आहेत –

1) Learning to know
2) Learning to do
3) Learning to be
4) Learning to live together

वरील चार सिद्धांतात जी मूल्य आहेत, ती शिक्षणाच्या माध्यमातून संक्रमित करावी लागतील.

1) **Learning to know :-** प्राथमिक स्तराचा विचार केल्यास आम्हास खालील बाबींचे ज्ञान देणे आवश्यक आहे. What is good? Love good and do good. हे घटक वैयक्तिक मूल्यांशी संबंधित आहेत. ह्यात भावनिक मूल्य व शारीरिक मूल्य विद्यमान आहेत.




हे उद्देश साकार करण्यासाठी खालील विषयांची शिफारस करण्यात येत आहे.

1) Value based body care science
2) Yoga based value education
3) Universal relegion practice
4) Value based environmental education

2) **Learning to do :-** हा माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा उद्देश आहे. याच्या माध्यमातून प्रत्येक परिवर्तनास स्वीकृत करण्याची अधिक क्षमता व्यक्तिमध्ये विकसित होईल. व्यवसाय शिक्षणाचा पाया मजबूत केला जाईल. ज्या विषयात विद्यार्थ्यांना अभिरुची आहे त्या विषयाची निवड करण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना असेल. हे व्यवसाय शिक्षण मूल्याधिष्ठित असेल. Professional values च्या आधारावर व्यवसाय शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला जाईल. हा अभ्यासक्रम दोन विभागात असेल – (१) तात्त्विक, (२) प्रात्यक्षिक. तात्त्विक भागात Professional ethics and Professional Values ह्याबाबत तात्त्विक विवेचन, तर प्रात्यक्षिक कार्यांतर्गत मूल्याधिष्ठित व्यवसायाचे शास्त्रशुद्ध ज्ञान विद्यार्थ्याला दिले जाईल. परिवर्तनाला स्वीकृती देण्याची अधिक्षमता निर्माण करण्यासाठी Education about religionची एक योजना तयार करावी लागेल.मा. जस्टीस शहा यांच्या मते, 'Students have to be given the awareness that the essence of every religion is common only the practices differ' याच्या आधारावर व्यक्तीत सहनशीलता, आदरभाव, सहिष्णुता ह्यात संवर्धन होईल.

3) **Learning to be :-** मानवातील मानवत्व जागृत ठेवते ते खरे शिक्षण. जीवनाच्या प्रति सकारात्मक दृष्टिकोन व समतोल व्यक्तित्त्व निर्माण, हा शिक्षणाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. उच्च माध्यमिक स्तरावर व्यक्तीमध्ये विभिन्न मानवीय गुणांचा विकास करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता आहे. कारण या भौतिक वादाच्या वादळात जर मानवाला स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल, तर ह्या गुणांचे प्रशिक्षण त्याला शिक्षणाच्या माध्यमातून द्यावे लागेल. ह्याकरिता Value based Mental Engineering ह्या विषयाची शिफारस करण्यात येत आहे. ह्या विषयाच्या माध्यमातून व्यक्ती सुदृढ मानसिकतेची संरचना शिकेल व मानवीय गुणांना मजबूत करणाऱ्या विविध गुणांचा समन्वय आपल्या व्यक्तिमत्त्वात घडवून आणेल. ह्या अंतर्गत प्रत्येक मूल्यांच्या कार्यात्मक परिभाषा व त्याचा सराव ह्या गोष्टींना प्राधान्य देणे अनिवार्य राहील. ह्याच स्तरावर आणखी एका विषयाची शिफारस करण्यात येत आहे. तो विषय म्हणजे Value based Population Education कारण पौगंडावस्थेत जर मूल्याधिष्ठित लोकसंख्या शिक्षण प्रदान केले, तर निश्चितपणे नैतिकतेला प्राधान्य मिळू शकेल.


4) **Learning to live together :-** हा उच्च शिक्षणाचा स्तर असेल व ह्या स्तराचा मुख्य उद्देश आहे 'To develop the positive attitude towards philosophy of co-existence' अर्थात सह–अस्तित्वाचा स्वीकार करण्याच्या मानसिकतेला विकसित करणे ह्या उद्देशावर भर देण्यात येईल. जस्टीस शहा म्हणतात, How to co-exist not only with human bodies. But all

living beings on the earth, may be animals vegetation and invironment including air and water. अर्थात व्यक्तीचा दृष्टिकोन सार्वभौम बनवायचा आहे. याकरिता उच्च शिक्षणात विभिन्न तत्त्वज्ञांच्या तत्त्वांचा समावेश करावा लागेल. हे तत्त्वज्ञ सर्व धर्मातील असतील व अशा तत्त्वांची निवड केली जाईल, जी सर्वकालीक आहे.

वरील उद्देश सफल करण्याकरिता व शिक्षणात मूल्य विकास घडवून आणण्याकरिता सार्वभौम मूल्यांचे अर्थात Universal Values चे पंचशील तत्त्व सुचविण्यात येत आहे.

१) सत्य (Truth)
२) धर्म (Rightous conduct)
३) शांती (Peace)
४) प्रेम (Love)
५) अहिंसा (Non-violence)


पुढील आकृतीच्या माध्यमातून हे उद्देश अधिक स्पष्ट होतात –




Value Oriented Education

**मूल्याधिष्ठित शिक्षण व अभ्यासक्रम :-**

मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम हा पुढील आकृतीवरून स्पष्ट होतो.




**मूल्याधिष्ठित अध्यापन पद्धती** – आज शिक्षण पद्धतीचा विचार केल्यास आजची अध्यापन पद्धती ही मूल्याधिष्ठित नाही असे लक्षात येते. प्रत्येक विषयाचे अध्यापन हे मूल्याधिष्ठित करण्याकरिता खालील बाबी शिक्षकांना करणे अनिवार्य करावे लागेल.

(१) प्रत्येक विषयाच्या अध्यापनापूर्वी प्रत्येक घटकाचे मूल्यशोध तक्ते तयार करावे लागतील.

(२) त्यातील समाविष्ट मूल्यांच्या आधारावर शिक्षकांनी Lesson Planning तयार करणे अनिवार्य असेल.

(३) मूल्यांच्या विकासाचे उद्देश समोर ठेवून Diagnostic Approach असणाऱ्या Test निर्माण केल्या जातील. त्यामुळे शिक्षकांच्या अध्यापनाचे स्वरूप Remedial Teaching मध्ये परिवर्तित होईल.

(४) उपचारात्मक अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतील 'मूल्यविकास' पडताळला जाईल.

(५) ह्या सर्व बाबींमध्ये यशस्विता प्राप्त करण्यासाठी शिक्षण प्रणालीत परिवर्तन घडवून आणावे लागेल.

**प्राथमिक स्तरावर मूल्याधिष्ठित शिक्षण :** प्राथमिक स्तरावर मूल्याधिष्ठित शिक्षणाकरिता खालील उपाय सुचविण्यात येत आहेत.

प्राथमिक स्तरावर 'दिनचर्या' या मुद्याच्या आधारावर मूल्य शिक्षण देण्यात येईल. 'दिनचर्ये'चा अर्थ विभिन्न धर्मातील जे 'Code of Conduct' देण्यात आले आहे. त्याच्या आधारावर 'Universal Code of Conduct' तयार करून त्याचे परिवर्तन दिनचर्येअंतर्गत करण्यात येईल. प्राथमिक अवस्था ही संस्कारक्षम अवस्था आहे. या अवस्थेत जेवढे चांगले संस्कार व्यक्ती ग्रहण करेल तेवढा तो एक सुसंस्कारित मानव बनू शकेल. ह्याकरिता प्राथमिक अवस्था ही सगळ्या अवस्थांचा पाया आहे. शिवाय संस्कार हे मानसिक प्रशिक्षण आहे. म्हणूनच ह्या मूल्य संस्कारांच्या आधारावर व्यक्तीमध्ये परिवर्तन आणता येऊ शकते. प्राथमिक स्तरावर मूल्यशिक्षणाबाबत पुस्तक राहणार नाही. मूल्यशिक्षणाचे माध्यम केवळ मौखिक असेल. ज्यात दिनचर्या, व्यायाम, सुसंस्कारांनी परिपूर्ण कथा यांचा अंतर्भाव करण्यात येईल.

**उच्च प्राथमिक स्तरावर मूल्याधिष्ठित शिक्षण :** उच्च प्राथमिक स्तरावरील प्रत्येक विषयाचे अध्यापन 'मूल्याधिष्ठित' असेल. आणि अशा घटकांची निवड करण्यात येईल, ज्यात अत्याधिक मूल्य आहेत व जे सार्वभौम मूल्यांचे प्रतिनिधित्व करतात. आधुनिक मूल्य संस्कारांचा प्रारंभ ह्याच अवस्थेपासून होईल. आधुनिक मूल्यांमध्ये विज्ञान प्रेम, व्यक्ती स्वातंत्र्यता, समान संधी, स्वावलंबन इ. मूल्यांचे संस्कार करण्याच्या हेतूने विषयाची संरचना करण्यात येईल.

**माध्यमिक स्तरावर मूल्याधिष्ठित शिक्षण :** माध्यमिक स्तरावर संस्कारांचा पाया बराचसा मजबूत होतो. म्हणूनच ह्या अवस्थेत आधुनिक व प्राचीन मूल्यांच्या समन्वयात्मक दृष्टिकोनास अनुसरून अभ्यासक्रमाची निर्मिती होईल. विद्यार्थ्यांना आपल्या अभिरुचीच्या आधारावर अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. माध्यमिक स्तरावरील शिक्षण विद्यार्थ्यांना Wisdom बनविण्याकरिता प्राथमिक घटक म्हणून सिद्ध होईल.

**उच्च स्तरावर मूल्याधिष्ठित शिक्षण :** उच्चस्तरीय शिक्षणाचा Universal Values हा गाभा असेल. ह्या तत्त्वांच्या आधारावर विषयांचे निर्धारण होईल. त्याकरिता विषयांचा पारंपारिक ढाचा बदलावा लागेल व शिक्षणात राष्ट्रभक्ती व आध्यात्मिकतेस प्राधान्य देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## शिक्षणाचे विविध स्तर व मूल्य शिक्षण

**निम्न प्राथमिक स्तर**

१. दिनचर्येच्या आधारावर मूल्य शिक्षण
२. Universal Code of Conduct
३. मूल्य शिक्षणाकरिता पुस्तक नको, मौखिक माध्यम
४. व्यायाम, कथा, धर्मातील सुविचार, वचने इ.च्या माध्यमातून

**उच्च माध्यमिक स्तर**

१. प्रत्येक विषयाचे मूल्याधिष्ठित अध्यापन.
२. सार्वभौम मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे घटक यात असावेत.
३. आधुनिक मूल्यांचे संस्कार याच वयापासून करावेत. उदा. विज्ञानप्रेम, व्यक्तिस्वातंत्र्यता, समान संधी, स्वावलंबन.

**माध्यमिक स्तर**

१. प्राचीन मूल्य व आधुनिक मूल्यांच्या प्रती समन्वयात्मक दृष्टिकोन.
२. अभिरुचीच्या आधारावर अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य.
३. प्राचीन मूल्यांच्या संदर्भात ज्ञान.
४. Universal Values ह्या शिक्षणाचे गाभा घटक असतील.
५. विषयांचा पारंपरिक दृष्टिकोन बदलावा लागेल.
६. राष्ट्रभक्ती व आध्यात्मिकता याला प्राधान्य.

**उच्च स्तर**

१. सार्वभौम धर्माचे ज्ञान.
२. भारतीय संविधानाचे ज्ञान.
३. भारतीय संपदेचे ज्ञान.
४. नवीन वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञान.
५. आधुनिक विचार प्रवाहांचे ज्ञान.

**मूल्याधिष्ठित शिक्षण व मूल्यमापनः** शिक्षणाच्या मूल्यमापनात नैदानिक उपागमाच्या माध्यमातून मूल्यांकन केल्यास त्यात वस्तुनिष्ठता अधिक राहील. हे मूल्यांकन मानवतावादी तत्त्वावर असेल. आजची मूल्यमापन प्रणाली ही सदोष आहे. हे दोष घालविण्याकरिता खालीलप्रमाणे मूल्यमापन प्रक्रिया सुचविण्यात येत आहे.

**प्राथमिक स्तर :** प्राथमिक स्तरावर औपचारिक मूल्यांकन नसेल. अध्यापक आपल्या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण निरीक्षणाच्या माध्यमातून मूल्यमापन करतील व हे करीत असताना त्यांचा नैदानिक दृष्टिकोन असेल.

**माध्यमिक स्तर :** नैदानिक कसोटीच्या आधारावर सर्वप्रथम विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांच्या अस्तित्वाची पारख करण्यात येईल व उपचारात्मक अध्यापनानंतर पुन्हा मूल्यमापन करण्यात येईल. विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून नैदानिक कसोट्यांची निर्मिती करण्यात येईल. हे मूल्यांकन चार स्तरांवर असेल –

(१) शिक्षक (२) विद्यार्थी (३) मित्र (४) पालक

ह्या चार स्तरीय मूल्यमापनाच्या आधारे एक तौलनिक मूल्यमापन होऊन विद्यार्थ्यांना श्रेणी दिली जाईल. मूल्याधारित शिक्षणाचे योग्य मूल्यांकन होण्याकरिता प्रशासकीय स्तरावर विविध मूल्यांकन अधिकारी असतील. ज्यांचे 'राष्ट्रीय मूल्य शिक्षण, मूल्यांकन केंद्र' हे नियंत्रण केंद्र असेल. ज्यांच्या अंतर्गत राज्य स्तर, जिल्हा स्तर, तहसील स्तर, अशा विविध स्तरांवर मूल्यांकन केंद्रे असतील.


**प्रत्येक स्तरावर कसोटी :** विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अवस्थेमध्ये Diagnostic Test घेण्यात येईल. ही Value added diagnostic test विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून विविध अवस्थांकरिता बनविली जाईल. प्राथमिक अवस्थेत ह्याचे स्वरूप मौखिक असेल, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर ह्याचे स्वरूप त्रिस्तरीय राहील. ज्यात विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा समावेश केला जाईल. या कसोटीचे मूल्यांकन तुलनात्मक दृष्टिकोनातून के ठ जाईल व उपचारात्मक अध्यापनाच्या माध्यमातून मूल्य त्रुटी दूर करण्यात येतील.

## मूल्यशिक्षण व मूल्यमापन

**प्राथमिक स्तर**

१. मूल्यमापन नाही
२. सातत्यपूर्ण निरीक्षण
३. नैदानिक दृष्टिकोन

**माध्यमिक व उच्च स्तर**




उच्चस्तर Standardise Value Test विविध क्षेत्रांशी निगडित

**मूल्याधिष्ठित शिक्षण प्रशिक्षण:** शिक्षण प्रणालीत शिक्षक हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. सुसंस्कारित शिक्षक हा शिक्षणाला समर्थ बनवू शकतो. ज्याचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे, ज्याला आध्यात्मिक अधिष्ठान आहे, जो मानवीय गुणांचा पुजारी

आहे, जो सहिष्णु आहे, जो प्रत्येक धर्मावर निष्ठा ठेवणारा आहे, शिवाय जो मूल्यांच्या प्रती जागरूक आहे, जो शिक्षणाचा खरा अर्थ जाणतो, ज्याचे आचरण आदर्श आहे, ज्ञानाच्या प्रती त्याला प्रेम आहे, स्वदेशावर निष्ठा आहे, ज्याचा प्राचीनता आणि आधुनिकता याबाबत समन्वयात्मक दृष्टिकोन आहे, जो जिज्ञासू आहे, अशा शिक्षकाच्या माध्यमातून मूल्य विकास योग्य दिशेने घडू शकेल. याकरिता शिक्षक शिक्षण मूल्याधिष्ठित असावे, त्याकरिता शिक्षण प्रशिक्षणात Qualitative Approach आणावा लागेल.

**पालक उद्बोधन :** कुटुंबही नागरिकत्त्वाची पहिली पाठशाळा आहे. बालकातील गुणविकास हा कुटुंबातूनच सुरू होतो. प्राचीन काळात कुटुंब हे मूल्य संस्काराचे प्रमुख केंद्र होते. आदर्श मूल्यांचे संस्कार बालकाला आपल्या कुटुंबाकडूनच प्राप्त होत असत. पण आज Flat संस्कृतीने आमची संस्कृती Flat केली, तर Apartment ने आमचे परिवार Apart झाले. आमच्या 'आई'चे स्थान 'मम्मी'ने घेतले, तर 'वडिलां'चे स्थान 'डॅडी'ने घेतले आणि येथेच खऱ्या अर्थाने आमची संस्कृती मृतवत् झाली. म्हणूनच अशी शिफारस करण्यात येते, की Universal Values ला अनुसरून सर्व पालकांचे उद्बोधन होणे अतिशय आवश्यक आहे. ह्याकरिता 'पालक उद्बोधन केंद्रा'ची शिफारस करण्यात येत आहे. ह्या केंद्राच्या माध्यमातून Value orientation course for parentsचे आयोजन करण्यात यावे व प्रत्येक पालकाकरिता ते अनिवार्य करावे लागेल.

अशा प्रकारे शिक्षणाच्या माध्यमातून मूल्य विकास करावयाचा असेल तर संपूर्ण प्रणालीमध्ये परिवर्तन करावे लागेल व शिक्षणात नैदानिक उपागम आणावा लागेल.